महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २८२ वे दिनांक : ०८/१०/२०२६ वार : गुरुवार

# पंढरपूरमध्ये शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीसाठी पोलिसांचा बंदोबस्त!



**सांगली :** पंढरपूरमध्ये शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीसाठी पोलिसांचा बंदोबस्त लावून जबरदस्तीने सुरू असलेल्या कारवाईवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. अशा प्रकारे गावकऱ्यांमध्ये दहशत निर्माण करणे हे लोकशाही मानणाऱ्या देशात अजिबात योग्य नसून, लोकांवर लादलेल्या या दडपशाहीची किंमत सरकारला निश्चितपणे मोजावी लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. जयंत पाटील म्हणाले, सरकारला हे करण्याची गरज का पडते, शेतकऱ्यांसोबत संवाद का साधत नाहीत? सरकार वन साइड रेटारेटी करून सर्व करत आहे. यामुळे सरकारची प्रतिमा मलीन होण्यास मदत होते. त्याची किंमत सरकारमध्ये बसलेल्या सगळ्यांना मोजावी लागेल. तसेच ज्या भागातून शक्तिपीठ महामार्ग जातो त्या भागातील लोकप्रतिनिधींना देखील याची किंमत मोजावी लागेल. विकासकामाला आमचा विरोध नाही. मात्र, आधीपासूनच त्या ठिकाणी व्यवस्था असताना नवी व्यवस्था करणे हे योग्य नसल्याचे मत जयंत पाटील यांनी व्यक्त केले आहे. पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, सरकारमध्ये आधीच पैसे नाहीत, लाडक्या बहिणींचे पैसे तटवले जातात. लाखभर कोटी रुपयांची बिल थकीत आहेत आणि त्यात आपण लाखभर कोटी रुपयांचा रस्ता केला जातो. त्यामुळे लोक आश्चर्याने बघायला लागले. एकीकडे पैसे नाही असे सांगितले जाते आणि दुसरीकडे एक लाख कोटी रुपयांचा रस्ता हे विचित्र आहे. लोकांची सहमती असेल तर जरूर करा, मात्र जर लोक विरोध करत असतील तर ते होऊ नये. सैन्य आणल्यासारखे पोलीस आणायचे आणि लोकांची गळचेपी करायची हे अत्यंत दुर्दैवी आहे, हे काही काळ सहन करतील पण त्याचा परिणाम भविष्यात दिसेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, शरद लाड यांच्या उमेदवारीवर बोलताना जयंत पाटील म्हणाले, शरद लाड यांना जाताना मी सांगितले होते जाऊ नका. भारतीय जनता पार्टी तुम्हाला तिकीट देणार नाही हे मी सांगितले होते. दोन दिवसात तुम्हाला तिकीट नाही दिले, तर तुम्ही काय करणार हे मी बोललो होतो. दुर्दैवाने मी म्हणत होतो तसेच झाले आहे. लाडांऐवजी भाजपमधल्या निष्ठावंताला तिकीट मिळाले असते तरी भाजपच्या कार्यकर्त्यांना आनंद झाला असता. शरद लाड हे बाहेरून आले म्हणून त्यांना विरोध केला, मग भाजपने त्यांचा निष्ठावंत कार्यकर्ता निवडला असता तर त्याच स्वागत झाले असते, पण तशी परिस्थिती दिसत नाही. शरद लाड हे तिकिटाच्या अशाने आत मध्ये गेले मात्र त्यांना तिकीटच दिले नाही. सत्तेत असणारे आश्वासन देत असतात आणि लोकही त्याला भुलत असतात. यांच्यासारखा अनुभव अनेक जणांना आला.

# ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देण्यास 2 महिन्यांहून अधिक विलंब

**नांदेड :** आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्रासाठी दाखल केलेल्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही न केल्याप्रकरणी बिलोली तहसील कार्यालयातील दोन महसूल कर्मचाऱ्यांवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कठोर कारवाई केली आहे. महसूल सहाय्यक सी.पी. धर्मेकर आणि सहाय्यक महसूल अधिकारी एन.व्ही. पाळेकर यांना निलंबित करण्यात आले आहे. नागरिकांना शासकीय सेवा देताना दिरंगाई अथवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश या कारवाईतून प्रशासनाने दिला आहे. बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील रहिवासी कार्तिक काशिनाथ पांडे यांनी ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र मिळण्यासाठी 28 जून 2026 रोजी महाऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज केला होता. आर्थिक दुर्बल घटकांच्या प्रमाणपत्राचा उपयोग शिक्षण, शासकीय नोकरी तसेच विविध शासकीय योजनांमध्ये आरक्षणाच्या लाभासाठी होत असल्याने अशा प्रमाणपत्रांसाठी प्राप्त अर्जांवर संबंधित विभागाने निर्धारित कालमर्यादेत कार्यवाही करणे अपेक्षित असते. मात्र, पांडे यांच्या अर्जावर संबंधितांकडून वेळेत कार्यवाही झाली नाही. अर्ज प्रलंबित राहिल्यानंतर अखेर 8 सप्टेंबर 2026 रोजी ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले. त्यामुळे अर्ज दाखल केल्यापासून प्रमाणपत्र मिळेपर्यंत तब्बल दोन महिन्यांहून अधिक कालावधी लागला. प्रमाणपत्र देण्यास झालेला हा विलंब अनावश्यक असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. या प्रकरणाची दखल घेत संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून झालेल्या दिरंगाईची चौकशी करण्यात आली. अर्जावर विहित वेळेत कार्यवाही न करणे, शासकीय कामकाजात निष्काळजीपणा करणे आणि नागरिकाला आवश्यक प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होण्यास कारणीभूत ठरणे, या बाबी गंभीर मानण्यात आल्या.

# मुलीला छेडणाऱ्यांपासून वाचवणे गुन्हेगारी असेल तर मी दहा वेळा करेन!



**पुणे :** "भाजयुमोचे नवनाथ बन यांनी माझ्यावर राजकीय आकसापोटी आणि एमपीएससीच्या (MPSC) पवित्र आंदोलनाला बदनाम करण्यासाठी बिनबुडाचे आरोप केले आहेत. मी नवनाथ बन यांच्यावर अब्रुनुकसानीचा फौजदारी दावा ठोकणार असून त्यांना थेट न्यायालयात खेचणार आहे. त्रास सहन करणाऱ्या एका मुलीला मदत करणे आणि तिला छेडणाऱ्यांपासून सुरक्षित घरी सोडणे याला जर सत्ताधारी गुंडगिरी म्हणत असतील, तर अशी गुंडगिरी मी दहा वेळा करेन," असा पलटवार युवक काँग्रेसचे नेते शिवराज मोरे यांनी केला आहे. पुण्यातील एमपीएससी आंदोलनावरून भाजप नेते नवनाथ बन यांनी कथित कोरेगाव पार्क राड्याचा व्हिडिओ जारी केल्यानंतर, शिवराज मोरे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत सर्व आरोपांचे खंडन केले. तसेच आपली नार्को टेस्ट आणि रक्त तपासणी करण्याचे थेट आव्हान गृहखात्याला दिले. व्हिडिओच्या सत्यतेवर आणि पार्श्वभूमीवर बोलताना शिवराज मोरे म्हणाले, "हा व्हिडिओ 1 ऑक्टोबरचा असून मी अलका टॉकीज चौकातील उपोषणाला बसण्यापूर्वी दोन दिवस आधीचा आहे. आंदोलन दडपण्यासाठी आणि मला खोट्या प्रकरणात अडकवण्यासाठी पुणे पोलिसांची मोठी यंत्रणा आणि वरिष्ठ अधिकारी गेल्या 48 तासांपासून प्रयत्न करत होते. माझे कॉल डिटेल्स (CDR) आणि लोकेशन आधीच तपासले गेले आहेत.“ "मी कोरेगाव पार्क परिसरात केवळ 10 ते 15 मिनिटे होतो. तिथे कोणताही गैरप्रकार घडलेला नाही. रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेजची मोडतोड करून (मॉर्फ करून) मला आणि विद्यार्थ्यांच्या हक्काच्या लढ्याला बदनाम करण्याचे षडयंत्र भाजप रचत आहे.“ कोरेगाव पार्क लेन नंबर 7 मधील घटनेचा संपूर्ण घटनाक्रम सांगताना त्यांनी स्पष्ट केले. "हैदराबादला राहणाऱ्या माझ्या एका मित्राची बहीण पुण्यात असते. तिच्यावर काही मुले दबाव आणत होती, मारहाण आणि अत्याचार करत होती. तिने आधी पोलिसांना संपर्क केला होता; मात्र पोलिसांनी वेळेवर प्रतिसाद न दिल्याने तिने व तिच्या आईने माझ्याशी संपर्क साधला. मी आमच्या सहकाऱ्यांना तिच्या संरक्षणासाठी पाठवले.“ "ते मुले आमच्या सहकाऱ्यांच्या अंगावर धावून जात असताना मी स्वतः तिथे पोहोचलो आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. 'हे प्रकरण थांबवा आणि निघून जा' एवढेच मी तिथे बोललो. याबाबत पोलिसांत अधिकृत 'एनसी' (NC) नोंदवण्यात आली आहे. एका असहाय्य भगिनीला मदत करणे हा जर गुन्हा असेल, तर मी कोणाच्या बापाला घाबरत नाही.“ दारू पिऊन धिंगाणा घातल्याच्या आरोपांना सडेतोड उत्तर देताना मोरे म्हणाले, "मी मद्यपान केले होते किंवा माझ्या रक्तात काही आढळले, असा संशय असेल तर माझी आत्ताच्या आत्ता नार्को टेस्ट आणि ब्लड टेस्ट करा. मी कोणत्याही वैद्यकीय तपासणीला सामोरे जाण्यास 100 टक्के तयार आहे. उलट, त्या त्रास देणाऱ्या मुलांची तपासणी करा, त्यांच्यात ड्रग्ज आढळतील.“ "पुण्यात नाईट लाईफ आणि मद्यधुंद धिंगाणा सुरू असल्याचा कांगावा करणाऱ्या नवनाथ बन यांनी आधी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्पादन शुल्क मंत्र्यांना जाब विचारावा. पुण्यात रात्री दोन-दोन आणि चार-चार वाजेपर्यंत पब व बार कोणाच्या आशीर्वादाने सुरू राहतात? महाराष्ट्राचा 'उडता पंजाब' कोणाच्या काळात झाला? याचे उत्तर आधी भाजप नेत्यांनी द्यावे.“ भाजपने केलेल्या 'दृश्यम' चित्रपटासारख्या स्क्रिप्टच्या आरोपावर मोरे म्हणाले, "कायदा हातात घेण्याचा प्रश्नच येत नाही, कारण आम्ही स्वतः पोलिसात कायदेशीर तक्रार दिली होती. विद्यार्थी आंदोलन फोडता येत नाही आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवता येत नाहीत म्हणून भाजप अशा क्लृप्त्या शोधत आहे. यापूर्वीही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (RSS) मुख्यालयावर मोर्चा काढला तेव्हा माझा गळा दाबण्याचा प्रयत्न झाला होता.“

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०८ ऑक्टोबर २०२६


## बौद्ध लेणी मार्गाच्या दुरवस्थेचा प्रश्न ऐरणीवर, महिनाभरात कामाचे आश्वासन



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील पत्रकारिता विभाग ते विधी विभागापर्यंतचा खराब झालेला रस्ता तातडीने दुरुस्त करावा, तसेच येत्या २० ऑक्टोबर रोजी बौद्ध लेणी येथे होणाऱ्या विजयादशमीच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. या मागणीसाठी सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी महापौरांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी विशुद्धानंदबोधी फाउंडेशनचे भदंत संघाप्रिय थेरो, भदंत बोधीधम्म थेरो तसेच अमरदिप हिवराळे उपस्थित होते. यावेळी रस्त्याच्या दुरवस्थेसह बौद्ध लेणी परिसरातील विविध प्रश्न आणि विजयादशमी कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक सुविधाबाबत सकारात्मक चर्चा झाली. विद्यापीठ परिसरातील पत्रकारिता विभाग ते विधी विभागादरम्यानचा रस्ता अत्यंत खराब झाला असून, या मार्गावरून दररोज ये-जा करणाऱ्या विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. खराब रस्त्यामुळे प्रवास करताना नागरिकांना शारीरिक त्रास सहन करावा लागत असून, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. शैक्षणिक परिसरातील रस्ते दर्जेदार व सुरक्षित असणे आवश्यक असताना या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिकांची गैरसोय होत आहे. तसेच खराब रस्त्यामुळे विद्यापीठाची प्रतिमा मलिन होत असल्याचेही आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले. दरम्यान, २० ऑक्टोबर रोजी बौद्ध लेणी येथे विजयादशमीचा कार्यक्रम होणार असून, महाराष्ट्राच्या विविध भागांतून हजारो अनुयायी या कार्यक्रमासाठी येत असतात. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमस्थळी जाणारा मार्ग तातडीने दुरुस्त करावा आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. यावेळी संबंधित प्रश्न एका महिन्याच्या कालावधीत मार्गी लावण्याचे आश्वासन प्रशासनाकडून भिक्खू संघाला देण्यात आले. त्यामुळे बौद्ध लेणी परिसरातील रस्ता तसेच इतर सुविधांचे प्रश्न लवकरच मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. विद्यापीठ परिसरातील इतर रस्ते चांगल्या स्थितीत असताना बौद्ध लेणीकडे जाणारा रस्ता मात्र दुर्लक्षित राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासनाने या रस्त्याचे काम तातडीने हाती घेऊन नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी केली. या निवेदनावर अक्रम खान (जिल्हाध्यक्ष), अमोल घुगे (युवा नेते), प्रा. अविनाश सावंत, अमोल खंडागळे, अत्तदिप भदर्गे मोहम्मद जैद आणि आरखम खान यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## केंद्रीय युवक महोत्सवाच्या पारंपरिक स्मृतिचिन्हात बदल



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराच्या प्रतिकृती असलेल्या पारंपरिक स्मृतिचिन्हाचे स्वरूप बदलण्यात आल्याने “विद्यापीठाच्या बोधचिन्हाचे विद्यार्थी कल्याण विभागाला वावडे आहे का?” असा थेट सवाल रिपब्लिकन विद्यार्थी सेनेने उपस्थित केला आहे.याप्रकरणी रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे मराठवाडा अध्यक्ष सचिन निकम,बाळू गायकवाड, कुणाल भालेराव यांनी प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांना निवेदन देऊन पारंपरिक स्मृतिचिन्ह पूर्ववत ठेवण्याची मागणी केली आहे.स्मृतिचिन्हात विविधता आणायची असल्यास पारंपरिक बोधचिन्ह मध्यवर्ती ठेवून त्यात दरवर्षी युवक महोत्सवाची थीम किंवा अन्य कलात्मक घटकांचा समावेश करता आला असता. मात्र, मूळ बोधचिन्ह जवळपास बाजूला करून बोधचिन्ह केवळ नावापुरते ठेवणे हा केवळ डिझाइनचा बदल नसून विद्यापीठाच्या ऐतिहासिक प्रतिमेशी संबंधित असून विद्यार्थी कल्याण संचालक यांनी जाणीवपूर्वक बदल केला आहे असा आक्षेप रिपब्लिकन विद्यार्थी सेनेने घेतला आहे.यापूर्वीही विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर प्रतिगेट/कमान उभारण्याचा प्रयत्न तसेच विद्यापीठाच्या बोधचिन्हात बदल करण्याचे प्रयत्न झाल्याचा संदर्भ देत, “बोधचिन्हाशी वारंवार छेडछाड करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक केले जात आहेत का?” असा सवाल संघटनेने केला आहे.स्मृतिचिन्ह बदलण्याचा निर्णय कोणी घेतला, कोणत्या अधिकार मंडळाची परवानगी घेण्यात आली, विद्यार्थ्यांचे अभिप्राय घेतले होते का आणि नवीन स्मृतिचिन्ह निश्चित करण्याची प्रक्रिया काय होती, याची माहिती जाहीर करण्याची मागणीही करण्यात आली आहे.“हा केवळ स्मृतिचिन्हाचा विषय नसून विद्यापीठाच्या ऐतिहासिक अस्मितेचा आणि विद्यार्थ्यांच्या भावनांचा प्रश्न आहे. त्यामुळे निर्णयाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी,” आणि विद्यार्थी कल्याण संचालक डॉ.कैलास अभुरे यांना पडमुक्त करावे अशी मागणी रिपब्लिकन विद्यार्थी सेनेने केली आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिंग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०८ ऑक्टोबर २०२६


## सुखना नदी काठच्या गावांमध्ये 'एक दिवस सुखनासाठी' उपक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** सुखना नदीच्या संवर्धनासाठी सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समितीच्या वतीने महिन्यातून एक दिवस सुखनासाठी या उपक्रमाचे आयोजन दिवाळी नंतर करण्यात येणार आहे. सुखना नदी काठच्या गावांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार असून यातून नदी स्वच्छता, वृक्षारोपण आणि जनजागृती ही कामे केली जाणार आहेत. नदीकाठची स्वच्छता करून प्लास्टिक व कचरा गोळा करणे, पाणी प्रवाह मोकळा करणे, तसेच गाव पातळीवर शंभरहून अधिक झाडे लावून पर्यावरण संवर्धन करणे हा यामागचा उद्देश आहे. याशिवाय गावोगावी ग्रामसभा आणि बैठका घेऊन शालेय विद्यार्थी आणि युवकांमध्ये पर्यावरणाबाबत जनजागृती केली जाणार आहे. सुखना नदी ही या भागाची जीवनवाहिनी असून ती वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन करण्यात आले आहे. चला सुखना वाचवूया हा संदेश देत या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी सांगितले. या उपक्रमासाठी संपर्क क्रमांक ९४०४०००३९८ वर संपर्क साधावा.

## श्याम भाऊ महाले यांच्या सकारात्मक विचारांची सदैव आठवण राहील



**कन्नड :** दै. शिवनातीर आणि मंगेश प्रिंटिंग प्रेसच्या माध्यमातून स्वतंत्र ओळख निर्माण करणारे स्व. प्रभाकर (श्याम भाऊ) मनोहर महाले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, स्नेहनगर, कन्नड येथे शोकसभा आयोजित करण्यात आली. यावेळी महाराष्ट्रातील ज्येष्ठ उद्योजक मा. श्री. मानसिंह पवार (बापूसाहेब) यांनी अध्यक्षीय समारोप करताना, "श्याम महाले यांनी नेहमीच सकारात्मक संस्कार आणि विचार मांडले. आपल्या चांगल्या स्वभावाने त्यांनी समाजातील प्रत्येकाला आपलेसे करून घेतले. चांगले काम करणाऱ्या व्यक्तीच्या सन्मानार्थ अशा शोकसभा व्हायला हव्यात," अशी भावना व्यक्त केली.ते पुढे म्हणाले, "श्याम भाऊ महाले यांनी कन्नड शहराजवळून वाहणाऱ्या शिवना नदीच्या नावावरून 'शिवनातीर' हे वृत्तपत्र सुरू केले. या माध्यमातून कन्नड तालुक्याची खरी ओळख आणि अस्मिता महाराष्ट्राच्या पटलावर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. तसेच मंगेश प्रिंटिंग प्रेसच्या माध्यमातून अनेक सुविधा व सेवा तालुक्यातील नागरिकांना उपलब्ध करून दिल्या. व्यावसायिक कार्यासोबतच सामाजिक प्रश्न, शहराचा विकास आणि सार्वजनिक जीवनातील विविध विषयांवर ते नेहमीच सकारात्मक दृष्टिकोनातून संवाद साधत असत."प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी आपल्या मनोगतात, "श्याम भाऊ आपल्या साध्या, सरळ आणि हसतमुख स्वभावाने प्रत्येकाला आपलेसे करून घेत असत. समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. तालुक्यातील राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर व्यक्ती श्याम भाऊंशी सल्लामसलत करत असत," असे सांगितले.शोकसभेत माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संतोषभाऊ कोल्हे, डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने डॉ. मिलिंद पाटील, वकील संघाच्या वतीने ॲड. कृष्णा जाधव, ज्येष्ठ नागरिक सुलतान भाईजी, पत्रकार संघाच्या वतीने श्री. संतोष निकम, साहित्यिक डॉ. शिवाजी हुसे, वंचित जनसंसदेचे अध्यक्ष डॉ. अंबादास सगट, कामगार चळवळीचे नेते राजेंद्र नलावडे, ज्ञानदीप क्लासेसचे रामकृष्ण तुपे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी स्व. श्याम भाऊंच्या आठवणींना उजाळा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनाने एक जिव्हाळ्याचा मित्र, सजग नागरिक आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.शोकसभेचे सूत्रसंचालन डॉ. प्रकाश खेत्री यांनी केले. उपस्थितांनी सामूहिक श्रद्धांजली अर्पण करून स्व. श्याम भाऊ महाले यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले. यावेळी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार, कुटुंबीय, नातेवाईक, शिक्षक, प्राध्यापक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे गांधी जयंती सप्ताहानिमित्त स्वच्छता मोहीम संपन्न



**कन्नड :** येथील शिवाजी महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राच्या वतीने महात्मा गांधी जयंती सप्ताहानिमित्त महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहिमेचे आयोजन (ता. ७ ) करण्यात आले होते.या मोहिमेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली.यावेळी कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून डॉ. शिवाजी हुसे यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या जीवन चरित्राबद्दल सविस्तर माहिती दिली. गांधीजींचे स्वच्छतेविषयीचे विचार आणि सत्य, अहिंसेचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.या कार्यक्रमासाठी आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रामचंद्र झाडे यांचे विशेष सहकार्य लाभले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या.यावेळी प्राध्यापकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता



**दौलताबाद :** शेख अमजद शेख बने वय वय ४५ वर्ष राहणार रतनजी मोह्हला दौलताबाद यांचे दि ०७ ऑक्टोबर बुधवार रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले आहेत्यांचे दफनविधी अब्दीमंडी येथील कब्रस्तान येथे रात्री साडे दहा वाजता करण्यात आलेत्यांच्या पश्चात आई, वडील ,पत्नी,दोन मुले,एक मुलगी असा परिवार आहेभाजपचे अल्पसंख्याक महामंत्री शेख बने यांचा मुलगा होता




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०८ ऑक्टोबर २०२६


## अंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग व तायक्वांदो स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाची 'सुवर्ण' कामगिरी



**नांदेड (प्रतिनिधी) :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या सेंटर झोन बॉक्सिंग व तायक्वांदो स्पर्धेत वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'सुवर्ण' कामगिरी बजावली आहे. सेंटर झोन बॉक्सिंग स्पर्धेत ओमकार मारतळे, जय उचडे आणि देवा पुयड या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वजन गटातून सुवर्ण पदक पटकावले. तायक्वांदो क्रीडा प्रकारातही जय उचले हा विद्यार्थी ६० ते ६५ किलो वजन गटात सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. हाडोळती येथील कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयात विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमान या स्पर्धा पार पडल्या. महाविद्यालयाच्या या यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांची नांदेड विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेच्या कॅम्पसाठी निवड झाली आहे. प्राचार्य प्रो. डॉ. शेखर घुंगरवार यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांची स्वागत आणि अभिनंदन केले. उपप्राचार्य डॉ. विष्णू राठोड, कार्यालयीन सेवानिवृत्त अधीक्षक रामराव राठोड, प्रा. डॉ. साहेबराव शिंदे, प्रा. डॉ. साहेबराव मोरे, प्रा. डॉ. राहुल सरोदे, प्रा. डॉ. महेश जाधव, प्रा. डॉ. शेख दुसरा मॅडम, प्रा. डॉ. कपिल इंगोले आधी उपस्थित होते.

## कबड्डीतील दहा वर्षांचे वर्चस्व मोडीत; श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय तालुक्यात अव्वल



**उमरगा :** एकुरगा येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत भारत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, उमरगाच्या कबड्डी संघाने दिमाखदार कामगिरी करत तालुक्यात अव्वल स्थान पटकावले. गेल्या तब्बल दहा वर्षांपासून कबड्डीच्या मैदानावर मुरूम आणि बलसूर या दोन संघांचे असलेले वर्चस्व मोडीत काढत महाविद्यालयाच्या संघाने ऐतिहासिक विजयाची नोंद केली.तालुक्यातील कबड्डीमध्ये गेल्या दशकभरापासून मुरूम आणि बलसूर या संघांचा दबदबा राहिला आहे. या दोन्ही संघांतील अनेक खेळाडूंनी राज्यस्तरावरही आपल्या खेळाचा ठसा उमटविला आहे. त्यामुळे या बलाढ्य संघांना पराभूत करण्याचे मोठे आव्हान महाविद्यालयाच्या संघासमोर होते.येथील श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी आत्मविश्वास, जिद्द, शिस्त आणि उत्कृष्ट सांघिक खेळाच्या जोरावर हे आव्हान लीलया पेलले. उपांत्य फेरीत मुरूमच्या बलाढ्य संघाला पराभूत करून महाविद्यालयाच्या संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात बलसूर संघाविरुद्धही दमदार खेळाचे प्रदर्शन करत विजय मिळविला आणि तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे विजेतपद आपल्या नावावर केले.या विजयामुळे महाविद्यालयाच्या कबड्डी संघाने तालुक्यातील गेल्या दहा वर्षांच्या वर्चस्वाला छेद देत क्रीडा क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. जी. एस. मोरे व पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी यांनी विजयी संघातील सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.संघाला मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक प्रा. गोविंद गायकवाड व प्रा. बालाजी सुरवसे यांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले. खेळाडूंच्या सातत्यपूर्ण सरावाला, जिद्दीला आणि सांघिक प्रयत्नांना मिळालेले हे यश असून, या विजयामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेला नवी ऊर्जा मिळाली आहे, असे मत प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी व्यक्त केले.

## २०२६ चा दुष्काळ

शेतकऱ्याच्या शेतात पिकतं म्हणून
तुमचा-आमचा खिसा गरम असतो
सगळंच पैशाने विकत मिळत नाही
दरवेळेला निसर्ग ठणकावत असतो
माझ्यावर वर्चस्व गाजवण्याचा
माणसाने प्रयत्न करू नये...

माणसाची जात ती
मान्य कधी करणार नाही
शिकवलेल्या धड्यातून
बोध कधी घेणार नाही...

या स्वार्थी माणसाला
चमत्कार दाखवल्याशिवाय
नमस्कार तो करत नाही
माणुसकी विकणाराच तो
लालचीपण सोडणार नाही...

शेताचा बांध कोरता-कोरता
नद्याच संपवून टाकल्या
जंगलही सपाट करून
सातबाऱ्याला जमिनी लावल्या...

पोत्याने पैसे दिले तरी
कोरोनाने,
फुकट मिळणारा ऑक्सिजन
विकत मिळू दिला नाही...

पावसाला लाच देऊनही
पाऊस काही येणार नाही
पावसा तुझ्याशिवाय हा
दुष्काळ काही सरणार नाही...

पुन्हा दिला धडा नवा
बोदाने पैसे दिले तरी
फुकट मिळणारं पाणी
आता विकत मिळणार नाही...

**- लक्ष्मण वाल्डे, कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**

## सुख दुःखाचा सोबती

सुख दुःखाचा सोबती,
माझा मेघराजा आहे.
असा कसा तू निर्दयी,
माझा अंत दुरून पाहे. १

तुझ्याविना नाही कोणी,
दुनियेत माझा वाली.
तुझ्याविना मेघराजा,
अधोगती माझी झाली. २

कसे जगावे जीवन,
आता कळत नाही काही.
तुझ्याविना शेतामध्ये,
पीक पिकणार नाही. ३

कसे होईल जगाचे,
बाप चिंतातूर झाला.
दुष्काळात जगतांना
जीव मेटाकुटीस आला. ४

मेघराजा तुझ्याविना,
शेत शिवार जळाले.
दुष्काळात पावसाचे,
महत्त्व सर्वांना कळाले. ५

हात जोडूनी सांगतो,
झाड तोडू नका कोणी,
पाऊस पडेल रे खूप,
झाड लावून द्या पाणी. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**




## जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत मुरूम कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींचा प्रथम क्रमांक



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** धाराशिव येथे आयोजित करण्यात आलेल्या १९ वर्षांखालील जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम येथील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे संघाची आगामी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या स्पर्धेत महाविद्यालयाच्या कृतिका इंगोले, अफसाना कुरणे, तसलीम जमादार, तेजस्विनी खजुरे आणि साक्षी कुचगे या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे उपाध्यक्ष अश्लेष मोरे सचिव पद्माकर राव हराळकर संचालक त्रंबकराव इंगोले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले व क्रीडा शिक्षक बालाजी इंगोले यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडूनही खेळाडूंचे कौतुक होत आहे.

## बारवालेची 'सादिया शेख' हिची एमबीबीएसला निवड

**जालना :** येथील बद्रीनारायण बारवाले कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. सादिया रिजवान शेख हिची जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज (JNMC), सावंगी, जिल्हा वर्धा येथे एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.सादिया ही बद्रीनारायण बारवाले कनिष्ठ महाविद्यालयाची प्रज्ञावंत विद्यार्थिनी असून तिने NEET परीक्षेत यश संपादन केले आहे. यामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे. याबद्दल तिचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी तिचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे म्हणाले, की, सादिया हिने जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. ती इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. तिने यशस्वी डॉक्टर होऊन समाजाची सेवा करावी.यावेळी माजी प्राचार्य डॉ. कविता प्राशर, प्रा.सचिन चव्हाण, प्रा. अभिषेक ढेंबरे, प्रा. विलास कांबळे, डॉ.अझर कांची, प्रा. मनीषा खरात, प्रा. सिमरन कपूर यांनी सादिया हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कन्नड तालुका साहित्य चळवळीचा हा सन्मान आहे



**कन्नड :** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्यामार्फत दरवर्षी नवोदित लेखक-कवींना प्रोत्साहन देण्यासाठी नवलेखक अनुदान योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत यंदा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील दोन प्रतिभावंत कवींच्या कवितासंग्रहाची निवड झाली असून कन्नडच्या साहित्यिक वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील कवी अरुण थोरात लिखित "गौताळ्याच्या रानवाटा"*आणि कवी भीमराव सोनवणे*लिखित "रानोमाळ"या दोन कविता संग्रहांना महाराष्ट्र शासनाचे अनुदान मंजूर झाले आहे. ग्रामीण बोली, शेत-शिवार, रान-वनातील जगणं आणि कष्टकऱ्यांच्या व्यथा या दोन्ही संग्रहातून प्रभावीपणे मांडण्यात आल्या आहेत.या गौरवास्पद निवडीबद्दल शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे मराठी विभाग व तिफण साहित्य परिवाराच्या वतीने विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते दोन्ही कवींचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, "हा फक्त दोन व्यक्तींचा सन्मान नसून हा शिवाजी महाविद्यालय तसेच कन्नड तालुक्यातील साहित्य चळवळीचा व तिफण परिवाराचा सन्मान आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तिफण परिवाराने कन्नड तालुक्यातील ग्रामीण साहित्यिकांना व्यासपीठ मिळवून देण्याचे काम केले आहे. त्याचेच हे फलित आहे. यापुढेही कन्नड तालुक्यात साहित्यिक चळवळीला पाठबळ देऊन नव लेखकांना व्यासपीठ मिळवून देऊ," असे विचार त्यांनी व्यक्त केले.या दोन्ही कविंनी आपल्या साहित्य प्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. गौताळा अभयारण्याच्या कुशीतल्या रानवाटा आणि रानोमाळ भटकंती यातूनच आपल्या कविता जन्माला आल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास उपप्राचार्य भाऊसाहेब मगर, मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, परिवर्तनवादी कवयित्री डॉ. प्रतिभा अहिरे, आजीवन अध्ययन विस्तार विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. अंबादास सगट, प्रा. रंगनाथ लहाने, प्रा. प्रवीण दाभाडे, लक्ष्मण वाल्डे, कु. पूजा चव्हाण आदी प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. पूजा चव्हाण यांनी केले.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.



## डॉ. रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेनमध्ये रंगली चुरशीची इतिहास प्रश्नमंजुषा स्पर्धा; ‘आग्रा फोर्ट’ संघ विजेता



**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थिनींमध्ये इतिहास विषयाबद्दल रुची निर्माण करणे, ऐतिहासिक ज्ञानाला चालना देणे आणि विद्यार्थिनींच्या स्पर्धात्मक कौशल्यांना वाव देण्याच्या उद्देशाने डॉ. रफिक झकेरिया कॉलेज फॉर वुमेनच्या इतिहास विभागातर्फे इतिहास प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण आणि चुरशीची ठरली.या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रो. विद्या प्रधान यांनी उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना अशा ज्ञानवर्धक आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थिनींच्या बौद्धिक क्षमतेसोबतच आत्मविश्वास, संघभावना आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित होण्यास मदत होते, असे सांगितले. त्यांनी इतिहास विभागाच्या या उपक्रमाचे कौतुक करून भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी प्रोत्साहन दिले.महाविद्यालयाचे IQAC Coordinator प्रो. तन्मय पैठणकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक करत अशा उपक्रमांमधून विद्यार्थिनींना पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे जाऊन ज्ञान मिळविण्याची संधी मिळते, असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागाच्या डॉ. लुबना शिरीन यांनी केले. त्यांनी स्पर्धेचा उद्देश, स्वरूप आणि विद्यार्थिनींच्या सहभागाचे महत्त्व स्पष्ट केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी इतिहास विभागाचे प्रा. इरफान शेख यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. अर्शिया नाझनीन यांनी आभार प्रदर्शन केले.या स्पर्धेत अजंठा, एलोरा, आग्रा फोर्ट आणि रेड फोर्ट या चार संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धा एकूण तीन फेऱ्यांमध्ये घेण्यात आली. प्रत्येक फेरीत संघांनी आत्मविश्वासाने आणि तत्परतेने प्रश्नांची उत्तरे देत आपले ज्ञानकौशल्य सिद्ध केले. अंतिम फेरीपर्यंत रंगलेल्या अटीतटीच्या सामन्यात ‘आग्रा फोर्ट’ संघाने विजेतेपद पटकावले.स्पर्धेचे परीक्षक म्हणून राज्यशास्त्र विभागाच्या डॉ. तलत सुलताना आणि हिंदी विभागाच्या डॉ. शेख लतीफ यांनी जबाबदारी पार पाडली. त्यांनी स्पर्धेचे परीक्षण अत्यंत निष्पक्षपणे आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने केले.स्पर्धेदरम्यान विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि संघांमधील चुरस विशेष लक्षवेधी ठरली. महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी स्पर्धकांचा उत्साह वाढविला. तीनही फेऱ्यांमध्ये रंगलेली अटीतटीची लढत आणि विद्यार्थिनींचा उत्साह यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले.इतिहास विभागाच्या या उपक्रमातून विद्यार्थिनींमध्ये इतिहास विषयाची आवड निर्माण करण्याबरोबरच ज्ञान, आत्मविश्वास, संघभावना आणि सकारात्मक स्पर्धात्मक वृत्ती विकसित करण्याचा प्रभावी प्रयत्न करण्यात आला.






## पुण्यात आंदोलनांचा धडाका : नोटीस मिळूनही पोलिस आयुक्तांची ठोस भूमिका नाही ?

**पुणे :** पुणे शहरात गेल्या काही दिवसांपासून विविध मागण्यांसाठी आंदोलने, उपोषणे, निदर्शने आणि मोर्चांचे सत्र सुरू आहे. विद्यार्थी, सामाजिक संघटना तसेच विविध राजकीय पक्षांकडून सातत्याने आंदोलने केली जात असल्याने शहरातील वाहतूक व्यवस्थेवर त्याचा परिणाम होत आहे. काही आंदोलनांमुळे प्रमुख रस्ते, चौक आणि मार्गांवर वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनांबाबत पुणे पोलीस प्रशासनाची भूमिका काय आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस आयुक्तांना नोटीस मिळाल्याने या प्रकरणाला आता वेगळे वळण मिळाले आहे. एकीकडे विविध मागण्यांसाठी आंदोलक रस्त्यावर उतरत असताना दुसरीकडे शहरातील कायदा-सुव्यवस्था आणि वाहतूक सुरळीत ठेवण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे. त्यामुळे आंदोलनांना परवानगी देताना कोणते निकष लावले जातात, आंदोलनाच्या ठिकाणी वाहतुकीचे नियोजन कसे केले जाते आणि नियमांचे उल्लंघन झाल्यास आयोजकांवर कोणती कारवाई केली जाते, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. पुणे हे शिक्षणाचे प्रमुख केंद्र असल्याने शहरात मोठ्या संख्येने विद्यार्थी वास्तव्यास आहेत. विविध शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रश्नांवर विद्यार्थ्यांकडून आंदोलनांचा मार्ग स्वीकारला जात आहे. काही आंदोलनांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होत असल्याने प्रमुख रस्ते आणि चौकांमध्ये गर्दी होत आहे. परिणामी वाहतूक मंदावणे, वाहनांच्या लांबच लांब रांगा लागणे आणि नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा गणे, अशा समस्या निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांना तसेच इतर आंदोलकांना आपल्या मागण्या मांडण्याचा लोकशाही अधिकार आहे. मात्र, त्याचवेळी आंदोलनाचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर विपरीत परिणाम होऊ नये, याची काळजी घेणेही आवश्यक आहे. त्यामुळे आंदोलनांसाठी निश्चित ठिकाणे, वेळ आणि वाहतुकीचे नियोजन याबाबत पोलिसांनी स्पष्ट भूमिका घेण्याची मागणी होत आहे. लोकशाही व्यवस्थेत आंदोलन हा नागरिकांचा महत्त्वाचा अधिकार मानला जातो. मात्र, सार्वजनिक रस्ते अडविणे, वाहतूक पूर्णपणे ठप्प करणे किंवा आंदोलनाच्या माध्यमातून कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होणे, हा गंभीर मुद्दा ठरू शकतो. त्यामुळे आंदोलनांना परवानगी देताना पोलिसांनी सार्वजनिक वाहतूक, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहने आणि अत्यावश्यक सेवांचा विचार करणे अपेक्षित आहे. आंदोलनादरम्यान नियमांचे उल्लंघन झाल्यास आयोजकांची जबाबदारी निश्चित केली जाते का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. परवानगीच्या अटींचे उल्लंघन झाल्यास कोणती कारवाई केली जाते, आंदोलनासाठी दिलेल्या परवानगीच्या अटी काय असतात आणि त्या अटींचे पालन करण्याची जबाबदारी कोणाची, याबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक आहे. ‘दरम्यान, काही आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर पुणे बंदची भाषा करण्यात आली असून शहर ठप्प करण्याचे इशारेही दिले जात आहेत. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर आंदोलक रस्त्यावर उतरल्यास वाहतूक व्यवस्थेसह शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने याबाबत आधीच नियोजन करून आवश्यक ती खबरदारी घेणे अपेक्षित आहे. मात्र, शहरात एकाच वेळी विविध आंदोलनांचे सत्र सुरू असतानाही पोलीस प्रशासनाकडून त्याबाबत ठोस भूमिका स्पष्टपणे समोर येत नसल्याने नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. आंदोलनांना लोकशाही मार्गाने परवानगी देताना त्याचवेळी नागरिकांची गैरसोय होणार नाही, यासाठी पोलिसांकडून प्रभावी नियोजन का केले जात नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. **पोलीस आयुक्तांच्या भूमिकेकडे लक्ष**आंदोलनांमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेता पोलीस प्रशासनाने आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून मार्ग काढणे आवश्यक आहे. आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांचा आदर राखत त्यांना आंदोलनासाठी निश्चित जागा आणि वेळ देणे, तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी मार्गांची व्यवस्था करणे, हा त्यातील महत्त्वाचा भाग ठरू शकतो. पोलीस आयुक्तांना नोटीस मिळाल्यानंतर आता प्रशासनाकडून कोणती भूमिका घेतली जाते, आंदोलनांच्या परवानगीबाबत काही नवीन नियम किंवा मार्गदर्शक सूचना जारी केल्या जातात का आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाते का, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे. एकीकडे नागरिकांच्या आंदोलनाच्या अधिकाराचे संरक्षण आणि दुसरीकडे शहरातील वाहतूक व कायदा-सुव्यवस्था कायम ठेवणे, अशी दुहेरी जबाबदारी पोलीस प्रशासनासमोर आहे. त्यामुळे या सर्व आंदोलनांबाबत पुणे पोलीस आयुक्त नेमकी कोणती भूमिका घेतात, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०८ ऑक्टोबर २०२६

# जिल्ह्यात ‘सेवा संकल्प अभियान’ उत्साहात सुरू;महसूल प्रशासनाच्या माध्यमातून ६७८ नागरिकांना विविध सेवांचा प्रत्यक्ष लाभ



**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि जिल्हाधिकारी कार्यालय बीडच्या नियंत्रणाखाली जिल्ह्यात सध्या ‘सेवा संकल्प अभियान’ अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या निर्धारित कालावधीत हे अभियान कार्यान्वित असून, याद्वारे ग्रामीण भागातील नागरिकांचे विविध महसुली व शासकीय प्रश्न तातडीने व एकाच छताखाली सोडविण्यावर भर दिला जात आहे. या अभियानांतर्गत तालुका स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, विविध योजनांचा व सेवांचा लाभ थेट सामान्य जनतेपर्यंत पोहोचवला जात आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, अभियानाचे गांभीर्य लक्षात घेऊन १७ सप्टेंबर २०२६ ते ६ ऑक्टोबर २०२६ या अवघ्या काही दिवसांच्या टप्प्यात एकूण ६७८ नागरिकांना विविध शासकीय सेवांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला आहे. यामध्ये महसूल विभागाशी संबंधित अनेक प्रलंबित प्रकरणांचा यशस्वी निपटारा करण्यात प्रशासनाला मोठे यश आले आहे.विविध सेवांचा तपशील आणि प्रशासकीय कार्यवाही:या अभियानांतर्गत शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या विविध कागदपत्रांच्या व प्रमाणपत्रांच्या अडचणी दूर करण्यात आल्या आहेत. प्रलंबित फेरफार नोंदीचा निपटारा करणे या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात तब्बल २६२ प्रकरणांचा यशस्वी निकाल लावण्यात आला आहे. तसेच मालमत्ता हस्तांतरणाची नोंद घेण्याच्या १०५ प्रकरणांची पूर्तता करण्यात आली असून, गावकऱ्यांना दस्तऐवज आणि नोंदी अद्ययावत करणे सोपे झाले आहे. याशिवाय नागरिकांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कामांसाठी अत्यंत आवश्यक असणारे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ९५ पात्र नागरिकांना तात्काळ वितरित करण्यात आले आहेत.जन्म आणि मृत्यूची नोंद घेणे तसेच त्यांचे अधिकृत प्रमाणपत्र देण्याच्या प्रकरणात ६८ नागरिकांना लाभ मिळाला आहे. नागरिकांना दैनंदिन जीवनात व प्रशासकीय कामांसाठी उपयोगी पडणाऱ्या शिधापत्रिका (रेशन कार्ड) वितरणांतर्गत ३२ पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व वीज जोडणीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले उचलताना नवीन नळ जोडण्या देण्यासाठी ५० जणांना मंजुरी देण्यात आली आहे, तर प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजुरी देण्याच्या प्रकरणात ५ नागरिकांचे प्रश्न मार्गी लागले आहेत.याशिवाय, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत सिंचन विहिरींसाठी अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांच्या २ ऑनलाईन नोंदी करण्यात आल्या आहेत. दिव्यांग कल्याण व सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने ५ जणांना दिव्यांग प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. विवाह नोंदणीचे ३ दाखले वितरित करण्यात आले असून, नऊ नागरिकांना नवीन आधार कार्ड व त्यासंबंधित सेवांचा लाभ देण्यात आला आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने पाऊल टाकत महिला बचत गटांच्या नोंदणीची ५ प्रकरणे पूर्ण करण्यात आली आहेत. शेतकरी वर्गाच्या जमिनीच्या नोंदी अधिक अचूक करण्यासाठी ७/१२ व ८ अ च्या नोंदी अद्ययावत करण्याच्या १२ कारवाया पूर्ण झाल्या असून, जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार जमिनीच्या मोजणीशी जोडण्याचे ३ संदर्भ यशस्वीरीत्या जोडण्यात आले आहेत. एफआरए (Forest Rights Act) अंतर्गत ७ ई/१२ ई दाखले ५ जणांना वाटप करण्यात आले आहेत, तर व्हीजेटीएन (VJNT) प्रवर्गातील ११ जणांना जात प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली आहेत.नागरिकांचा वाढता प्रतिसाद आणि प्रशासकीय यंत्रणेचे योगदान:तालुका स्तरावर आयोजित या शिबिरांमुळे नागरिकांना आपल्या कामांसाठी जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी वा वारंवार कार्यालयात फेऱ्या मारण्याची गरज उरलेली नाही. एकाच ठिकाणी महसूल आणि इतर संलग्न विभागांचे अधिकारी उपलब्ध राहत असल्याने लोकांच्या अडचणी तत्काळ समजून घेऊन त्यावर जागेवरच तोडगा काढला जात आहे. बीड जिल्ह्यात महसूल प्रशासनाच्या या उपक्रमाला नागरिकांकडून अत्यंत उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, आगामी काळात अधिकाधिक लोकांपर्यंत या सेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. या अभियानामुळे पारदर्शकता वाढून शासकीय यंत्रणा थेट जनतेच्या दारात पोहोचल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे

## केंद्र सरकारकडून विशेष मदतीची मागणी; केंद्रीय पथकाकडून आठ ऑक्टोबरपासून महाराष्ट्राची पाहणी

**नवी दिल्ली / बीड (भगवंत पाळवदे) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यात आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी श्री. शाह यांना महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीची आणि राज्य सरकार याबाबत करत असलेल्या उपाययोजनाची माहिती देऊन केंद्र सरकारकडून विशेष मदतीची मागणी केली. यासोबतच मुख्यमंत्र्यांनी आज केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी नागपूर विमानतळाच्या विस्तारीकरणासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा केली. या चर्चेमुळे नागपूर विमानतळासाठी आवश्यक असणारी संरक्षण विभागाची सत्तावीस एकर जागा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री शाह यांच्यासोबत झालेल्या आपल्या भेटीत राज्य सरकारने केंद्राकडे पाठविलेल्या प्रस्तावाची आगाऊ प्रतही दिली. राज्यातील सुमारे ३२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची गंभीर परिस्थिती असून जवळपास ८० टक्के तालुके दुष्काळाने बाधित असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. दुष्काळाच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्रीय पथक ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रातील विविध भागांचा दौरा करणार आहे. या पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी करूनवस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर केला जाणार असून, राज्याने पाठविलेला प्रस्ताव आणि पथकाचा अहवाल यांच्या आधारे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत मदतीबाबत निर्णय होणार आहे. केंद्राकडून महाराष्ट्राला जास्तीत जास्त मदत देण्यात येईल,असे सांगून केंद्रीय मंत्री शाह यांनी केंद्र सरकार भक्कमपणे महाराष्ट्राच्या पाठीशी उभे राहील, असे आश्वस्त केल्याचेही श्री फडणवीस यांनी सांगितले. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी झालेल्या चर्चेचा संदर्भ देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, उपग्रह प्रतिमांच्या निकषांबरोबरच पावसातील खंड, भूजल पातळी, पिकांचे नुकसान आणि प्रत्यक्ष पाहणी यांसारख्या अन्य निकषांचाही विचार केला जाणार आहे. काही तालुके उपग्रह प्रतिमांच्या निकषात बसत नसले तरी इतर निकषांवर पात्र ठरत असल्यास त्यांचाही विचार केला जाईल. सुमारे २० तालुक्यांमध्येही पिकांच्या नुकसानीच्या आधारे दुष्काळी मदत देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.राज्याच्या निधीतून शेतकऱ्यांना तातडीने मदतकेंद्राकडून मदत मिळण्यास वेळ लागू शकतो, त्यामुळे राज्य सरकार आपल्या उपलब्ध संसाधनांतून शेतकऱ्यांना प्रथम मदत करण्याच्या तयारीत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सुमारे २३ हजार गावांमध्ये काही पिकांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून उर्वरित सर्वेक्षणाची कार्यवाहीही वेगाने सुरू आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर विमानतळासाठी २७ एकर जागा हस्तांतराचा मार्ग मोकळामुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचीही भेट घेतली. नागपूर विमानतळाच्या नव्या टर्मिनल इमारतीसाठी आवश्यक असलेल्या २७ एकर जागेचा प्रश्न या बैठकीत चर्चिला गेला. ही जागा सध्या भारतीय वायुदलाच्या ताब्यात आहे.नवीन टर्मिनलच्या कामासाठी आवश्यक जागा तातडीने हस्तांतरित करण्यास वायुदलाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. उर्वरित भागासाठी आवश्यक बांधकाम पूर्ण करून तो भागही पुढे हस्तांतरित करण्यात येणार आहे. या बैठकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. बांधकामासाठी आवश्यक अवजड यंत्रसामग्रीच्या हालचालीसाठी वायुदलाच्या परिसरातील हेलिकॉप्टर पार्किंग व अन्य कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक परवानग्या देण्यासही संरक्षण मंत्रालयाने सहमती दर्शविली असून, त्यासाठी आवश्यक ‘एसओपी’ तयार करण्यात येणार आहे.यामुळे नागपूर विमानतळाच्या टर्मिनल प्रकल्पासाठी असलेले अडथळे दूर झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.एमपीएससी आंदोलनाबाबत सरकारची भूमिका विद्यार्थीहिताचीएमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत प्रतिक्रिया देतांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मांडलेल्या पाचही मागण्यांवर राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली असून,महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांवरील चौकशीसंदर्भात न्यायालयीन चौकशी करण्यास सरकारने तयारी दर्शविली आहे. चौकशीत गैरप्रकार किंवा गैरवर्तन आढळल्यास संविधानातील कलम ३१७ नुसार पुढील कार्यवाही करण्याची भूमिकाही सरकारने स्पष्ट केली आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षामध्ये पारदर्शकता वाढविण्यासाठी व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून, विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, माजी विद्यार्थी आणि अन्य संबंधित घटकांशी संवाद साधून सुधारणा सुचविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या प्रश्नाऐवजी आंदोलनाचा राजकीय वापर केला जात असल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यातील पोलिसांनी आंदोलनादरम्यान अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळली असून, विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०८ ऑक्टोबर २०२६


# “दुष्काळी धाराशिवला जलसंजीवनी मिळणार? नळदुर्गच्या बोरी नदीवर नव्या धरणाची शक्यता तपासण्याची मागणी”

नळदुर्ग : धाराशिव जिल्ह्याच्या कायमस्वरूपी दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी नळदुर्ग परिसरातील बोरी नदीच्या खोऱ्यात नवीन धरण अथवा मोठा अतिरिक्त जलसाठा निर्माण करण्याची तांत्रिक शक्यता तपासावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी वनस्पतीशास्त्रज्ञ व प्राध्यापक डॉ. संजय रावसाहेब बिरादार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयात तसेच महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयात सविस्तर निवेदन व अहवाल सादर केला असून, केंद्र व राज्य शासनाच्या संबंधित तज्ज्ञ यंत्रणेमार्फत या प्रस्तावाचा वैज्ञानिक व तांत्रिक अभ्यास करण्याची मागणी केली आहे. धाराशिव जिल्हा हा महाराष्ट्रातील दुष्काळप्रवण भागांपैकी एक आहे. जिल्हा प्रशासनाच्या अधिकृत माहितीनुसार जिल्ह्याचे हवामान सामान्यतः कोरडे असून जिल्ह्याचा मोठा भाग दुष्काळप्रवण आहे. पावसाळा मुख्यतः जून ते सप्टेंबर या कालावधीत असतो.त्यामुळे पावसाचे पाणी उपलब्ध असतानाच ते मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवणे आणि भूजल पुनर्भरण वाढविणे ही धाराशिवच्या भविष्यातील जलसुरक्षेची अत्यंत महत्त्वाची गरज आहे. नळदुर्गच का? नळदुर्ग हा केवळ ऐतिहासिक किल्ला नाही, तर तो प्राचीन जलव्यवस्थापन आणि अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे. किल्ल्यालगत वाहणाऱ्या बोरी नदीवर बांधलेल्या धरणामध्येच पाणी महालाची निर्मिती करण्यात आली असून, महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या माहितीनुसार ही रचना इब्राहिम आदिलशहा द्वितीयच्या काळात सन १६१३ मध्ये उभारण्यात आली. पावसाळ्यात धरणावरून वाहणारे पाणी आणि पाणी महालाचे दृश्य आजही पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. म्हणजेच शेकडो वर्षांपूर्वी नळदुर्गच्या तत्कालीन अभियंत्यांनी पाण्यालाच किल्ल्याच्या संरक्षण व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनविले होते. आज त्याच भौगोलिक रचनेचा आधुनिक जलव्यवस्थापनासाठी वैज्ञानिक पद्धतीने उपयोग करता येईल का, हा प्रश्न आता गांभीर्याने तपासण्याची वेळ आली आहे. नव्या धरणाची शक्यता का तपासावी? नळदुर्ग परिसरात बोरी नदीचे पात्र, नैसर्गिक दऱ्या, आसपासची उंच भू-रचना आणि उपलब्ध जलग्रहण क्षेत्र यांचा एकत्रित विचार केल्यास येथे अतिरिक्त जलसाठा निर्माण करण्याची शक्यता असू शकते. मात्र, हा केवळ प्राथमिक विचार असून धरण बांधणे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे की नाही, हे जलवैज्ञानिक, भूगर्भीय आणि संरचनात्मक सर्वेक्षणानंतरच निश्चित होऊ शकते. यासाठी अत्याधुनिक GIS, उपग्रह प्रतिमा, ड्रोन सर्वेक्षण, Digital Elevation Model, भूगर्भीय तपासणी आणि जलवैज्ञानिक मॉडेलिंग यांचा वापर करून संपूर्ण परिसराचा अभ्यास करणे आवश्यक आहे. नवीन धरणामुळे मोठ्या प्रमाणात जलसाठा निर्माण झाल्यास त्याचा उपयोग केवळ शेतीसाठी नव्हे, तर पिण्याचे पाणी, भूजल पुनर्भरण, विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी वाढविणे, पशुधनासाठी पाणी आणि स्थानिक पर्यावरण संवर्धन यासाठीही होऊ शकतो. धाराशिवच्या शेतकऱ्यांसाठी मोठी संधी धाराशिव जिल्ह्यात पावसावर अवलंबून असलेली शेती मोठ्या प्रमाणावर आहे. पाऊस कमी झाला किंवा पावसामध्ये मोठा खंड पडला की त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पादनावर होतो. विशेष म्हणजे २०२६-२७ या वर्षासाठीही धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी खासगी पाणी टँकरची तरतूद करण्याची अधिकृत कार्यवाही करण्यात आली आहे. यावरून पाणीटंचाईचे आव्हान आजही किती गंभीर आहे, हे स्पष्ट होते. याच पार्श्वभूमीवर “पाऊस पडला की पाणी वाहून जाऊ द्यायचे आणि उन्हाळ्यात पाण्यासाठी टँकरची वाट पाहायची” या चक्रातून धाराशिवला बाहेर काढण्यासाठी दीर्घकालीन जलसाठा निर्मितीवर भर देणे आवश्यक आहे. नळदुर्ग ते तुळजापूर, लोहारा, उमरगा — जलसुरक्षेचा नवा मार्ग बोरी नदीवरील अतिरिक्त जलसाठ्याचा वैज्ञानिकदृष्ट्या योग्य वापर झाल्यास नळदुर्ग परिसरासह तुळजापूर, लोहारा, उमरगा आणि आसपासच्या ग्रामीण भागातील पाणीप्रश्नावर दीर्घकालीन उपाययोजना करण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. तथापि, कोणत्याही प्रकल्पामुळे ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला, पाणी महाल, तटबंदी, पुरातत्त्वीय वास्तू, स्थानिक गावे किंवा पर्यावरणाला धोका निर्माण होता कामा नये. त्यामुळे “किल्ला वाचवा आणि पाणीही वाढवा” या दोन्ही उद्दिष्टांचा समन्वय साधणे आवश्यक आहे. किल्ल्याला धोका न पोहोचविता प्रकल्पाचा अभ्यास व्हावा प्रा. डॉ. बिरादार यांनी स्पष्ट केले आहे की, नळदुर्ग किल्ल्याच्या ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण ही सर्वांत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे प्रस्तावित जलसाठ्यामुळे पाणी महाल, किल्ल्याची तटबंदी किंवा इतर ऐतिहासिक वास्तूंवर कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. नळदुर्ग किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे बोरी नदीचे पाणी अडवून निर्माण केलेली ऐतिहासिक जलव्यवस्था आणि पाणी महाल. धाराशिव जिल्हा प्रशासनही या धरण व पाणी महालाच्या ऐतिहासिक संबंधाचा उल्लेख करते. म्हणूनच नवीन जलसाठ्याचा प्रस्ताव पुरातत्त्व, पर्यावरण आणि अभियांत्रिकी या तिन्ही दृष्टीने सुरक्षित असल्याचे सिद्ध झाल्यानंतरच पुढे नेण्यात यावा. पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांकडे अहवाल या महत्त्वपूर्ण विषयाकडे केंद्र आणि राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रा. डॉ. संजय रावसाहेब बिरादार यांनी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयात तसेच माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयात सविस्तर निवेदन व अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये नळदुर्ग परिसरातील भौगोलिक परिस्थिती, बोरी नदीचे खोरे, दुष्काळी परिस्थिती, संभाव्य जलसाठा क्षमता, शेतकरी व नागरिकांची पाण्याची गरज तसेच ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याचे संरक्षण या सर्व बाबींचा विचार करून नवीन धरण अथवा अतिरिक्त जलसाठा निर्माण करण्याची तांत्रिक व्यवहार्यता तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. आता गरज आहे ती तज्ज्ञांच्या सर्वेक्षणाची हा प्रस्ताव केवळ मागणी म्हणून न पाहता एक वैज्ञानिक शक्यता म्हणून तपासला जावा, अशी भूमिका प्रा. डॉ. बिरादार यांनी मांडली आहे. केंद्र शासनाच्या केंद्रीय जल आयोगाचे तज्ज्ञ, महाराष्ट्र जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग, भूगर्भशास्त्रज्ञ, जलवैज्ञानिक, पर्यावरण तज्ज्ञ आणि पुरातत्त्व विभाग यांच्या संयुक्त पथकाने नळदुर्ग परिसराची पाहणी करून Feasibility Report आणि त्यानंतर आवश्यक असल्यास Detailed Project Report (DPR) तयार करावा. अहवालामध्ये जर नवीन धरण किंवा जलसाठा तांत्रिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या आणि पर्यावरणीयदृष्ट्या योग्य ठरत असेल, तर त्याबाबत पुढील कार्यवाही करावी. अन्यथा त्याच उद्देशाने अधिक प्रभावी पर्यायी जलसंधारण उपाययोजना सुचवाव्यात. दुष्काळमुक्त धाराशिवसाठी एक दूरदृष्टीचा विचार धाराशिवच्या जनतेला दरवर्षी पाणीटंचाई, शेतीतील अनिश्चितता आणि भूजलपातळीतील घट यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी आजपासून दीर्घकालीन नियोजन आवश्यक आहे. नळदुर्गचा ऐतिहासिक वारसा जपत, बोरी नदीच्या पाण्याचा वैज्ञानिक वापर करून भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा जलसाठा निर्माण करता येईल का? या एका प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठीच तांत्रिक सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. नळदुर्गचा इतिहास आपल्याला सांगतो की, पाणी हेच जीवन आणि पाणी व्यवस्थापन हेच विकासाचे खरे आधारस्तंभ आहेत. शेकडो वर्षांपूर्वी पाण्याचा उपयोग किल्ल्याच्या संरक्षणासाठी करण्यात आला; आता त्याच परिसरातील जलस्त्रोतांचा उपयोग शेतकरी, नागरिक आणि पुढील पिढ्यांच्या जलसुरक्षेसाठी करण्याची वेळ आली आहे. नवीन धरण शक्य आहे का? — याचा निर्णय तज्ज्ञांनी घ्यावा; पण त्याची शक्यता तपासणे ही आजची गरज आहे. वनस्पतीशास्त्रज्ञ व प्राध्यापक डॉ. संजय रावसाहेब बिरादार यांनी नळदुर्ग परिसरातील जलसुरक्षेबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करून भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयाकडे सादर केला होता. या प्रस्तावामध्ये नळदुर्ग परिसरातील बोरी नदीचे खोरे, नैसर्गिक भौगोलिक रचना, संभाव्य जलसाठा, धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांची पाण्याची गरज तसेच ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला व पाणी महालाचे संरक्षण या सर्व बाबींचा विचार करून तांत्रिक व्यवहार्यता अभ्यास करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रस्तावाला आता केंद्र शासनाच्या Centralized Public Grievance Redress and Monitoring System (CPGRAMS) मध्ये अधिकृत नोंदणी मिळाली आहे. नोंदणी क्रमांक : MINWR/E/2026/0002566 सरकारी नोंदीनुसार तक्रारदाराचे नाव Sanjay Raosaheb Biradar असून अर्जाची प्राप्ती तारीख 27 सप्टेंबर 2026 आहे. हा विषय Department of Water Resources, River Development & Ganga Rejuvenation, Ministry of Jal Shakti यांच्याकडे नोंदविण्यात आला आहे. अर्जामध्ये विषयाची नोंद “Water Resources Development and Management – River Development” या विभागांतर्गत करण्यात आली आहे. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे या प्रकरणाची 28 सप्टेंबर 2026 रोजी पुढील कार्यवाहीसाठी नोंद झाली असून ते सध्या “Under Process” या स्थितीत आहे. तसेच हे प्रकरण National Dam Safety Authority (NDSA) कडे संबंधित अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आले आहे. Officer Concerned : Shri Mohammad Zishan



**प्रा. डॉ. संजय रावसाहेब बिरादार**
**वनस्पतीशास्त्रज्ञ व प्राध्यापक**
**उमरगा, जि. धाराशिव**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002